



Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!






संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784
Email- jansanchlan@gmail.com

वर्ष ३ रे | अंक : ७०६ . वा | मंगळवार | दि. १२ मार्च २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३रुपये

# बुलढाणा लोकसभेची जागा भाजपानेच लढवावी.. लोकसभा प्रमुख विजयराज शिंदे



## मेहकर येथील भाजपा मेळाव्यात जिल्हा भाजपच्या कार्यकर्त्यांच्या मनातील खदखद उघड...

**भाग-2**

**जनसंचलन/मेहकर**

येथे भारतीय जनता पक्षाची लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर घाटावरील जिल्हाची प्रमुख पदाधिकारी यांची आढावा बैठक स्थानिक कृषी वैभव लॉन्स येथे संपन्न झाली. यावेळी मेळाव्यास आमदार सौ.श्व-ेताताई महाले पाटील,लोकसभा प्रमुख मा.आमदार विजयराज शिंदे ,जिल्हाध्यक्ष गणेशजी मांटे, लोकसभा समन्वयक मोहनजी शर्मा,लोकसभा विस्तारक संतोषजी देशमुख, मेहकर विधानसभा प्रमुख प्रा प्रकाश गवई, ई मान्यवरांची उपस्थिती होती. यावेळी बैठकीस संबोधित लोकसभा प्रमुख यांनी जिल्हयातील भरा-तील भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्या मनातील खदखद आपल्या मनोगतातून व्यक्त केली. त्यांनी बोलतांना सांगितले की यापू-र्वीही बुलढाणा लोकसभेची जागा ही भाजपने दोन वेळा जिंकली आहे. जिल्हयात भाजपचे ३ आमदार आहे व लोकसभेसाठी सर्वाधिक लिड हा भाजपच्या मतदार संघातूनच मिळत आलेला आहे. त्यामुळे आगामी बुलढाणा लोकसभेची जागा वरिष्ठांनी भाजपा पक्षाकडे घेण्यासाठी पुढाकार घ्यावा अशी तमाम कार्यकर्त्यांची भावना आहे याव-ेळी उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी सुद्धा या मागणीस दुजोरा देत घोषणाबाजी करत एकमताने लोकसभेवर कमळ फुलवू असा विश्वास आपल्या प्रतिसादातुन व्यक्त केला आहे.त्यामुळे आता बुलढाणा लोकसभेची जागा हि भाजपलाच मिळावी अशी मागणी आहे.



**लोकसभा २०२४ निवडणूक विषयी बुलढाणा अर्बनचे सर्वेसर्वा राधेश्याम चांडक उर्फ भाईजी यांना पत्रकारांनी त्यांच्या संभावित उमेदवारीबाबत विचारले असता,भाईजी बोलले की, मी तिकीट मागणार नाही. भाजपने जबाबदारी दिल्यास नक्कीच निवडणूक लढवीन. पक्षाने दिलेल्या आदेशाचा पालन करून ही निवडणूक जिंकण्याचा पुरेपूर प्रयत्न करेन. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ४०० पार चे स्वप्न राधेश्याम चांडक यांच्या विजया स्वरूपात पूर्ण होईल व मोदींच्या गळ्यातील ४०० खासदारांच्या विजयाचा पहिला हार हा बुलडाणा जिल्ह्याचाच राहील, असा विश्वास भाईजींनी व्यक्त केला.**




दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# राजर्षी शाहू मल्टीस्टेटच्या अध्यक्षा मालतीताई शेळके यांना बेस्ट चेअरमन पुरस्कार!

## महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनने केला गौरव..!

जनसंचलन /बुलडाणा

राजर्षी शाहू मल्टिस्टेट को- ऑप. क्रेडिट सोसायटीच्या अध्यक्षा मालतीताई शेळके यांना बेस्ट चेअरमन पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. जागतिक महिला दिनाच्यानिमित्ताने सक्षम महिला सक्षम सहकार अंतर्गत महिला प्रशिक्षण व कार्यशाळा पुरस्कार सोहळा ११ मार्च रोजी आळेफाटा (ता. जुन्नर जि. पुणे) येथे हा कार्यक्रम पार पडला. महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनद्वारा या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी राज्यभरातील सहकारी संस्थांच्या महिला प्रतिनिधी उपस्थित होत्या. अंजली उन्नती फाउंडेशनच्या गौरीताई बेनके, अनुसया महिला पतसंस्थेच्या संस्थापक किरण दिलीपराव वळसे यांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण करण्यात आले. सहकार क्षेत्रातील कार्यरत महिला प्रतिनिधींचा सन्मान तसेच उत्साह वाढवण्याच्या हेतूने सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सहकार क्षेत्रात कार्य करणाऱ्या




राज्यभरातील असंख्य महिला उपस्थित होत्या. राजर्षी शाहू मल्टीस्टेटच्या सर्व सदस्यांचा हा सन्मान असल्याच्या भावना मालतीताई शेळके यांनी पुरस्कार स्वीकारल्यानंतर व्यक्त केल्या.

# गांगलगाव सरपंच व सचिव करतात मनमानी गटविकास अधिकारी चिखली यांच्याकडे तक्रार दाखल

जनसंचलन / चिखली



चिखली तालुक्यातील मौजे गांगलगाव येथील ग्रामपंचायत सचिव व सरपंच यांनी खैरव ते अंबाशी ही नाली काही दिवसापूर्वी ग्रामपंचायत कार्यालय गांगलगाव यांनी बांधली होती परंतु तीच नाली गांगलगाव गावचे सरपंच व सचिव यांनी स्वतः चे फायद्यासाठी परत या नाली वर बांधकाम सुरू केले आहे तक्रारदार यांनी सरपंच यांना विचारलं असता सरपंच यांनी समाधान कारक उत्तर दिले नाही व तक्रारदार यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी चिखली पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांच्याकडे दिनांक ११/ ०३/२०२४ रोजी रीतसर तक्रार दाखल केली आहे तक्रारदार आणि मस्के यांनी या अगोदर २०२० ते २०२१ या कालावधीमध्ये जनाई माता पटगनातील नाली वर सुद्धा सरपंच व सचिव यांनी नाली असताना सुद्धा परत त्यांना त्याच नालीवर नाली बांधून अवैध बांधकाम केले आहे त्याची सुद्धा चौकशी करण्यात यावी व खैरव ते अंबाशी या नालीचे जे बांधकाम सुरू आहे ते सुद्धा चौकशी करून करण्यात यावे अशी तक्रार गांगलगावचे तक्रार करते अनिल म्हस्के यांनी गट विकास अधिकारी चिखली यांच्याकडे तक्रार दाखल केली आहे . गांगल गावचे सचिव यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधला असता सदर नाली बांधकाम ही जन सुविधा योजनेअंतर्गत काम सुरू आहे सदर नाली नवीनच बांधकाम सुरू आहे अशी माहिती गांगल गावचे ग्रामसेवक श्री इंगळे यांनी दूरध्वनीवरून दिली आहे . ज्या ठिकाणी निधी मिळाला त्या ठिकाणी नाली बांधकाम काम सुरू केले आहे सदर तक्रारकर्ते यांच्या शेताकडील रस्त्याचे नालीचे कामाचा प्रस्ताव सुद्धा पंचायत समिती चिखली, जिल्हा परिषद बुलढाणा व चिखलीचे आमदार सौ श्वेता ताई महाले पाटील यांच्याकडे सादर केला आहे सदर नालीचा बांधकामाचा निधी आल्यानंतर तक्रार करते यांच्या शेताकडील सुद्धा नाल्याचे बांधकाम करण्यात येईल अशी माहिती गांगल गावचे सरपंच नितीन म्हस्के यांनी दूरध्वनीवरून दिली आहे

# संविधानाच्या मार्गाने समाजासह देशाला जागतिक पातळीवर न्या : सिद्धार्थ खरात

## बाबासाहेबांमुळे आपण राजहंस झालो...मूकनायक बुलढाणा पुरस्कार वितरण सोहळा

जनसंचलन/बुलढाणा

अस्पृश्य म्हणून हीनवल्या जाणाऱ्या आपल्या समाजाला भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी माणूस म्हणून जगण्याचा अधिकार दिला. त्यांच्याच पुण्याईने शिकून मोठा झालो आणि मंत्रालयात उच्चपदापर्यंत पोहोचलो. बाबासाहेबांमुळेच आपण राजहंस झालो, असे भावोद्गार गृह मंत्रालयाचे सहसचिव सिद्धार्थ खरात यांनी जागतिक बौद्ध धम्म परिषदेत काढले. केवळ आपला समाजच नव्हे, तर संविधानाच्या मार्गावरून सध्या भरकटत असलेल्या देशाला सुद्धा संपन्न व समृद्ध करण्याची जबाबदारी आपणास घ्यावी लागणार असल्याचे आवाहन खरात यांनी केले.

बुलढाण्यात शनिवारी पार पडलेली जागतिक बौद्ध धम्म परिषद ऐतिहासिक ठरली. या परिषदेत मुख्य आयोजक सतीश पवार यांच्या हस्ते गृहमंत्रालयाचे सहसचिव सिद्धार्थ खरात, पुणे येथील उपजिल्हाधिकारी सिद्धार्थ भंडारे, ज्येष्ठ साहित्यिक नारायणराव जाधव येळगावकर, वैद्यकीय क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल डॉ. पंजाब हिरे, सैनिकी क्षेत्रातील कमांडट कॅप्टन मोनिका साळवे, उद्योजक डॉ. अर्चित हिराळे आणि सामाजिक सेवेबद्दल लक्ष्मण साळवे यांना सन्मानपत्र, सन्मानचिन्ह देऊन मूकनायक बुलडाणा या पुरस्काराने गौरविण्यात आले. यावेळी सत्काराला उत्तर देताना सिद्धार्थ खरात बोलत होते. मूकनायक फाऊंडेशनच्या वतीने माझ्यासह मान्यवरांना सन्मानित केल्याबद्दल सतीश पवार यांच्यासह सहकाऱ्यांचे आभार मानत सिद्धार्थ खरात म्हणाले, बुलडाणा शहरात प्रथमच इतक्या भव्यदिव्य स्वरुपात नेत्रदीपक जागतिक धम्मसभा पार पडली. आपण जीवनात काम करत असताना समाजोपयोगी कामे केली, तर समाज त्याची नोंद घेतो व सत्कारदेखील करतो. हीच बाब या क्षेत्रात काम करणाऱ्या नवीन लोकांसाठी धडा आहे. आपल्या ज्ञानाचा व अनुभवाचा फायदा समाजाला जास्तीत जास्त करून देण्याची जबाबदारी पुढे गेलेल्यांची आहे. शिक्षण, उच्च शिक्षण, स्वाभिमान व धम्माचरण ही आपली ओळख असली पाहिजे. या चार चाकांवर आपली सामाजिक प्रगती होणार आहे. आरक्षण आहे म्हणून आपण पुढे गेलो नाही तर बाबासाहेबांनी दिलेला शिक्षणाचा मूलमंत्र, स्वाभिमानी बाणा, हार न पत्करण्याची वृत्ती व धम्माचरण यावर मार्गाक्रमण केले म्हणून जगाने आचंबित व्हावे, अशी आपण प्रगती केली आहे. गेल्या ३० वर्षांपासून मी शासनात आहे. जवळजवळ १७ वर्षे मी विविध मंत्रांकडे आहे. त्यामुळे शासन आणि प्रशासनाची मला चांगली जाण आहे. हा नोकरीचा भाग असलातरी समाजाशी नाळ कधीच




तुटू दिली नाही. आपल्यातली व्यक्ती मोठा झाली की ती समाजाकडे फिरकून पाहात नाही, ही खंत आहे. सामाजिक चळवळ राबविण्यात लोक पुढे येत नाहीत. मात्र, सतीश पवार यांनी समाज घडविण्याचे हाती घेतलेले कार्य वाखाणण्याजोगे आहे. त्यांनी यशस्वी केलेली धम्म परिषद ही सर्वांसाठी एक मिसाल ठरणार असल्याचे गौरवोद्गारही खरात यांनी काढले. मनोगत व्यक्त करताना उपजिल्हाधिकारी सिद्धार्थ भंडारे म्हणाले, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक क्षेत्रात आपण पुढे गेलो पाहिजे. समाजकारण, राजकारणात पुढे येणाऱ्यांना समाजच पर्याय निर्माण करतो, त्यांना साथ देत नाही. यामुळे प्रगती खुंटते. बाबासाहेबांनी जे स्वातंत्र्य दिले, त्याची किंमत तरुण पिढीला नाही. तरुणांनी शिक्षण घ्यावे. सगळ्यांनाच नोकऱ्या मिळणार नाहीत. त्यासाठी विविध कौशल्ये आत्मसात करून विविध क्षेत्रात नावलौकिक मिळवा आणि समाजाची उंची वाढवा, असे आवाहन त्यांनी केले.

# सगोडा येथे क्षारयुक्त पाण्यामुळे किडनीचा आजार, एकाच मृत्यू...

जनसंचलन / संग्रामपूर



संग्रामपूर तालुक्यातील सगोडा येथील संजय सीताराम पूरकर (वय ५२) यांचा किडनीच्या आजाराने मृत्यू झाला. बोरखेड परिसरातील गावांमधील नागरिकांना क्षारयुक्त पाणी प्यावे लागत असल्याने अनेकांना किडनीच्या आजाराने ग्रासले आहे. गत एका वर्षात दोघांचा मृत्यू झाला आहे. अकोला जिल्ह्यातील अकोट, बुलढाणा जिल्ह्यातील संग्रामपूर तालुक्यात अनेक गावे खारपाण पट्ट्यात येतात. या गावांमध्ये विहिरींना क्षारयुक्त खारे पाणी लागते. हे पाणी नागरिकांना प्यावे लागत असल्याने किडनीचे आजार होतात. सगोडा येथील संजय पुरकर भूमिहीन असून यांची हलाखीची परिस्थिती असताना देखील त्यांनी अकोला येथे खाजगी हॉस्पिटलमध्ये चार वर्षे उपचार घेतले. सगोडा गावात अजूनही १४० गाव पाणीपुरवठा योजनेचे पाणी पोहोचले नाही. या गावातील नागरिकांना क्षारयुक्त पाणी प्यावे लागत आहे. गतवर्षीसुद्धा गावातील शित्रे यांचा किडनीच्या आजाराने मृत्यू झाला होता. संजय पूरकर यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली, मुलगा असा आप्त परिवार आहे. शासनाने पूरकर यांच्या कुटुंबीयांना आर्थिक साहाय्य देण्याची मागणी होत आहे.

The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784 Title Code- MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

# धरण, नाल्यातील गाळ काढण्याची मोहिम राबवावी

## -जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील

**जनसंचलन/बुलडाणा**

धरणातील गाळ काढणे आणि नाला खोलीकरणासाठी राज्य शासनाने निर्देश दिले आहेत. यासाठी जिल्ह्यातील स्वयंसेवी संस्थांनी पुढाकार घेतला आहे. जिल्ह्यात प्रामुख्याने जळगाव जामोद आणि संग्रामपूर तालुक्यातील पुरामुळे गाळ साचल्याने नाला खोलीकरणास वाव आहे. त्यामुळे जिल्ह्यात धरण आणि नाल्यातील गाळ काढण्यासाठी मोहिम राबवावी, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले.धरण आणि नाल्यातील गाळ काढण्यासंदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक घेण्यात आली. यावेळी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी मनोजकुमार ढगे, जिल्हा जलसंधारण अधिकारी अमोल मुंडे, मुख्याधिकारी गणेश पांडे यांच्यासह स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते. जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी, गाळमुक्त धरण आणि नाला खोलीकरणासाठी जलयुक्त शिवार योजनेतून कार्य करण्यात येत आहे. तसेच सामंजस्य करार करण्यात आला आहे. त्यामुळे जलसंधारण विभागाने धरणामध्ये किती गाळ साचला आहे, याची माहिती घेण्यात यावी. हा गाळ काढण्यासाठी स्वयंसेवी संस्थांनी तातडीने पावले उचलावीत. निवडण्यात आलेल्या संस्थांना तालुकानिहाय कामे वाटप करण्यात यावीत. धरणातील गाळ काढण्यासाठी चार महिन्यांचा कालावधी आहे. त्यामुळे संस्थांनी जास्तीत जास्त गाळ काढण्यासाठी प्रयत्नशील व्हावे. जिल्ह्यातील संग्रामपूर आणि जळगाव जामोद तालुक्यातील पुरामुळे नाल्यांमध्ये गाळ साचला आहे. तसेच पाण्याचा प्रवाह बंद झाला आहे. हा गाळ प्राधान्याने काढण्यासाठी पावले उचलावीत. नाला खोलीकरण हे वर्षभर चालणार आहे. त्यामुळे आवश्यक असलेल्या निधीची मागणी आतापासूनच करण्यात यावी. गाळ काढण्यासाठी राज्य शासनाचा आर्ट ऑफ लिव्हींग सोबत करार झाला आहे. त्यामुळे ज्याठिकाणी संस्था उपलब्ध नसल्यास अशी गावे आर्ट ऑफ लिव्हिंगला देण्यात यावी. गाळ काढण्यासाठी डिझेलचा खर्च स्वयंसेवी संस्थांना देण्यात येणार आहे. त्यामुळे दिलेली कामे पूर्ण करणे क्रमप्राप्त आहे. त्यामुळे येत्या आठ दिवसात कामांना प्रत्यक्ष सुरवात करण्यात यावी.



पिण्याचे पाणी आणि आवश्यकता भासल्यास सिंचनासाठी पाणी उपलब्ध होणार असल्याने धरणातील गाळ काढण्यासाठी आर्ट ऑफ लिव्हींगने पुढाकार घेतला आहे. जिल्ह्यात ४१ ठिकाणी ही संस्था कार्य करणार आहे. ही कामे तातडीने सुरू होण्यासाठी स्वयंसेवी संस्थानी प्रयत्नशील राहावे. गाळ काढण्यासाठी आवश्यक यंत्रसामग्री आतापासूनच तयार ठेवण्यात यावी. ज्या धरणामध्ये पाणीसाठी शिल्लक राहिलेला नाही, तेथे तातडीने कामे सुरू करावीत. तसेच गाळ घेऊन जाण्यास इच्छुक असलेल्या शेतकऱ्यांशी संपर्क साधावा, असेही डॉ. पाटील यांनी यावेळी सांगितले.

# अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीसाठी अर्ज करावेत...

**जनसंचलन /बुलडाणा**

जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेत असलेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी भारत सरकार शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क परिक्षा शुल्क प्रतिपूर्ती व इतर योजनांचे नवीन व नुतनीकरण अर्ज ऑनलाईन प्रणालीवर भरण्याची प्रक्रिया कार्यान्वित झाली आहे. विद्यार्थी व महाविद्यालयांनी ऑनलाईन अर्ज सादर करण्याचे आवाहन एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे प्रकल्प अधिकारी मोहनकुमार व्यवहारे यांनी केले आहे. आदिवासी विकास विभागाकडून राज्यातील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी भारत सरकार शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क परिक्षा शुल्क प्रतिपुर्ती योजनेचा लाभ दिला जातो. ही योजना प्रकल्प कार्यालय, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत येत असलेल्या सर्व शासकिय निमशासकीय अनुदानित, विनाअनुदानित, कायम विना अनुदानित महाविद्यालयात राबविली जाते. या योजनेचा लाभ घेण्यासाठी शैक्षणिक सत्र २०२३-२४ साठी ... हे संकेतस्थळ ऑक्टोबर २०२३ पासून कार्यान्वित झाले आहे. त्यानुसार अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांनी सर्व दस्तऐवज जोडून महाविद्यालयास ऑनलाईन अर्ज करण्यासाठी निर्देश देण्यात आले आहेत. जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेत असलेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांनी नवीन आणि नुतनीकरण अर्ज विहित मुदतीत अर्ज भरुन महाविद्यालय स्तरावर सादर करावेत. तसेच गेल्या दोन वर्षापासून महाविद्यालयस्तरावर प्रलंबित असलेले अर्जामधील त्रृटी पूर्ण करून प्रकल्प अधिकारी यांच्या लॉगीनला मंजुरीसाठी पाठविण्यात यावेत. तसेच विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# बुलडाणा जिल्हा एसटी कास्ट्राईब कर्मचारी संघटनेची जिल्हा कार्यकारणी जाहीर

**जनसंचलन / बुलडाणा**



अनुसुचित जाती जमाती आयोग भारत सरकार व महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त बुलडाणा जिल्हा कास्ट्राईब राज्यपरिवहन कर्मचारी संघटनेची १० मार्च २०२४ रोजी दुपारी एक वाजता बुलडाणा येथील विसावा सरकारी विश्रांती गृहा मध्ये जिल्हा कार्यकारणीची महत्वपूर्ण बैठक महाराष्ट्र राज्य एसटी कास्ट्राईब कर्मचारी संघटनेचे माजी राज्यउपाध्यक्ष पत्रकार बाबासाहेब जाधव यांच्या आध्यक्षतेखाली जिल्हा भरातून आलेल्या असंख्य पदाधिकारी सभासदांच्या उपस्थीत संपन्न झाली. या बैठकीत बुलडाणा जिल्हा भरातून राप कास्ट्राईबचे असंख्य पदाधिकारी, सभासद हजर होते. या बैठकीत एसटी कर्मचाऱ्यावर आज रोजी प्रशासनाकडून होणाऱ्या अन्याय अत्याचारा यावर सविस्तर चर्चा झाली त्या अन्याय अत्याचारा विरूध्द कसे लढावयाचे यावर आकृतीबंध नियोजन करून लढावयाचे ते नियोजन ठरविण्यात आले. या महत्वपूर्ण बैठकीत २०२४ ची जिल्हा कार्यकारणी सर्वांच्या मताने लोकशाही मार्गाने जाहीर करण्यात आली विभागीय अध्यक्षपदी जिवन जाधव,विभागीय सचिव भारत आराख, जिल्हा कार्यध्यक्ष पत्रकार बाबासाहेब जाधव, विभागीय कोषाध्यक्ष जितेंद्र साळवे, विभागीय उपाध्यक्षपदी सेनि वाहतूक निरिक्षक आत्माराम चौतमोल तर विधी सल्लागारपदी सेनि विभागीय वाहतूक अधिकारी (आपराध) दिपक साळवे यांची एकमताने निवड करून त्यांचे पुष्प गुच्छ देवून स्वागत करण्यात आले.

यावेळी पद्माकर डोंगरे, हर्षदिप सोनपसारे, गौतम जाधव, दिपक मिसाळकर, रवि अवसरमोल, भाऊसाहेब देशमुख, विशाल जाधव, राजू गुरचवळे,मीलींद मेढे, संतोष घेवंदे, अतूल सरकटे, प्रितेश तायडे, अशोक गवई, पी.ए.पवार, किर्तीमाला दाभाडे, अनिता वाकोडे, संगीता वानखडे, लक्ष्मी बंड इत्यादी यावेळी जिल्हाभरातून असंख्य पदाधिकारी, सभासद हजर होते. या बैठकीचे प्रस्ताविक जीवन जाधव, सुत्रसंचलन भारत आराख तर आभार प्रदर्शन जितेंद्र साळवे यांनी केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# जागतिक महिला दिनानिमित्त महिला मॅरेथॉन स्पर्धेचे परिवार अर्बनचे आयोजन...

## ८१ वर्षीय आजी धावल्या महिला मॅरेथॉनमध्ये..






**जनसंचलन/ खामगाव**

जागतिक महिला दिना चे औचित्य साधून बुलढाणा येथे ज्ञानगंगा फॉरेस्ट रनर ग्रुप व बुलढाणा अर्बन, आदिती अर्बन, राष्ट्रमाता जिजाऊ महिला अर्बन आणि परिवार अर्बन यांच्या संयुक्त विद्यमाने महिला मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.. या रॅलीला अप्पर जिल्हा पोलीस अधीक्षक बीबी महामुनी यांनी हिरवी झेंडी दाखवत स्पर्धेला सुरुवात केली आहे.. ही स्पर्धा अजिंठा रोडवर ३ किलोमीटर धावणे आणि ६ किलोमीटर चालणे अशा दोन डिस्टन्स मध्ये स्पर्धा घेण्यात आली.. या स्पर्धेमध्ये बुलढाणा शहरातील जवळपास १००० हून अधिक स्पर्धकांनी भाग घेतला होता.. आणि महिला मॅरेथॉन स्पर्धा ही दरवर्षी मार्चमध्ये पहिल्या रविवारी आयोजित करण्यात येत असते.. विशेष म्हणजे या मॅरेथॉनमध्ये ८१ वर्षीय एक आजी धावले आहेत.. मुख्य ॲम्बेसिडर म्हणून अनुराधा सोळंकी या उपस्थित होत्या.. यावेळी परिवार अर्बनचे अध्यक्ष राहुल सावळे पाटील, कार्यकारी संचालक नितीन कानडजे पाटील, राजमाता जिजाऊ महिला अर्बनचे अध्यक्ष अनजुताई सावळे पाटील आणि परिवार अर्बनचे सचिव गजानन खंदारे संचालक अजय जाधव आणि परिवार अर्बनचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# शेतकऱ्याचं पोरगं आता दिल्लीत पाठवायचंच. शेगावातील निर्धार मेळाव्यात शेतकरीपुत्रांचा संकल्प

## शेगावसह जिल्ह्याला विकासाचे मॉडेल बनविणार : रविकांत तुपकर

जनसंचलन /शेगाव

गेल्या २२ वर्षांपासून घरादारावर तुळशीपत्र ठेवून चळवळीत काम करणारे एकमेव नेतृत्व म्हणजे रविकांत तुपकर आहेत. शेतकरी, कष्टकरी, तरुण व सर्वसामान्य जनतेचा हा बुलंद आवाज यावेळी लोकसभेत पाठवायचा, असा निर्धार घाटाखालील रविकांत तुपकरांच्या प्रमुख शिलेदारांनी संत गजानन महाराजांच्या पावनभुमित केला. आता जातीपातीचे राजकारण बस झाले. विदर्भाची पंढरी असलेल्या संत नगरी शेगाव सह बुलडाणा जिल्हा विकासाचे नवे मॉडेल बनले पाहिजे, असा विकास या जिल्ह्याचा साधावा लागणार आहे त्यासाठी आपण सर्वांनी एकजूट व्हावे, असे आवाहन बोलतांना रविकांत तुपकर यांनी केले. यावेळी जेष्ठ नेते दयाराम वानखेडे यांनी उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या.

रविकांत तुपकर यांच्या प्रमुख उपस्थिती शेगाव येथे ९ मार्चला घाटाखालील प्रमुख शिलेदारांचा निर्धार मेळावा धुमधडाक्यात पार पडला. शेगाव, खामगाव, जळगाव जामोद व संग्रामपूरमधील प्रमुख शिलेदारांनी या मेळाव्याला गर्दी केली होती. सुरुवातीला शहरात समर्थकांनी मोठ्या उत्साहात बैलगाडीतून रविकांत तुपकरांची मिरवणूक काढली. शेतकरी, कष्टकरी, महिला, तरुण व शहरातील सर्व सामान्य नागरिकांच्या न्याय्य हक्कासाठी व जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी येणाऱ्या लोकसभेतील परिवर्तनाची लढाई ताकदीने लढण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला. याप्रसंगी बोलतांना रविकांत तुपकर यांनी सांगितले की, संत नगरी शेगाव ही विदर्भाची पंढरी आहे. जगभरातून भाविक येथे येतात. इथे येणाऱ्या जगभरातील भाविकांची संख्या पाहता शेगावला विमानतळ देखील गरजेचे आहे. जिजाऊंचा हा जिल्हा आहे. त्यामुळे भक्ती आणि शक्तीचा संगम असलेला हा जिल्हा असल्याने जिल्ह्याचा सर्वांगीण विकास होणे गरजेचे होते परंतु गेल्या पंधरा वर्षात जिल्ह्याच्या विकासाला मोठी खीळ बसली आहे. जिल्ह्याचे नेतृत्व करणाऱ्या लोकप्रतिनिधींना या पंधरा वर्षात जिल्ह्यातील ८०% टक्के गावातही पोहचता आले नाही. जिल्ह्यात तेराशे गाव आहेत. एका माणसाने कुठे कुठे फिरावे असे ते म्हणतात पण मग जर तुम्हाला गावात जायचे नसेल तर लोकांनी तुमच्या पाठीमागे का उभे राहावे..? असा सवाल आता जनता करत आहे. कापसाच्या आणि सोयाबीनच्या भावाबाबत मला विचारणाकरता, परंतु मला विचारल्यापेक्षा तुम्हीच उत्तर दिली पाहिजे. पंधरा वर्षात तुम्ही काय केलं..? सोयाबीन-कापसाच्या भावासाठी किती वेळा आवाज उठवला हे सांगायला पाहिजे, परंतु काही केलेच नाही तर सांगतील काय..? म्हणून आता विरोधक माझ्यावर उलट सुलट आरप करत आहेत. पण आता जन-



तेला सगळं कळलं आहे. जिल्हाभरात सर्वसामान्य नागरिकांचा मला मिळत असलेला प्रतिसाद व आशीर्वाद ही माझ्या कामाची पावती आहे. संत गजानन महाराजांच्या चरणी जो कोणी स्वच्छ आणि निर्मळ मनाने पूर्ण विश्वास ठेवून येतो त्याच्या सर्व मनोकामना गजानन महाराज पूर्ण करतात आणि आज हे हजारो कार्यकर्ते जिल्ह्यात परिवर्तन घडविण्याचा निर्धार घेऊन गजानन महाराजांच्या चरणी आले आहेत त्यांना निश्चितच यश येणार आहे. घरच्या भाकरी घेऊन आज कार्यकर्ते जिल्हाभर परिवर्तन घडविण्यासाठी फिरत आहेत. आपण आजवर जातीपातीचे राजकारण केले असेल, धर्माच्या नावावर राजकारण केले असेल, पक्षाच्या नावावर राजकारण केले असेल परंतु आता आपल्याला शेतकरी, कष्टकरी, तरुण आणि सर्वसामान्य जनतेच्या न्याय हक्कासाठी मत देऊन आपल्या जिल्ह्यात परिवर्तन घडवायचे आहे. संत गजानन महाराजांच्या या पावन भूमीत आज परिवर्तनाचा निर्धार करून आतापासूनच कामाला लागा, असे आवाहन यावेळी रविकांत तुपकर यांनी केले.

# मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियानांतर्गत श्री शिवाजी हायस्कूल जांभोरा शाळेला मिळाला तिसरा क्रमांक...

जनसंचलन/ सिं.राजा



माझी शाळा सुंदर शाळा मुख्यमंत्री अभियान उपक्रमात सिंदखेडराजा तालुक्यातील श्री शिवाजी हायस्कुल जांभोरा शाळेला तालुक्यातुन तिसऱ्या क्रमांकाचे पुरस्कार १ लाख रुपये जाहीर झाले असुन यामध्ये मुख्याध्यापक उगले, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थ्यांचे कौतुक होत आहे. या पुरस्काराचे वितरण उद्या १२ मार्च २०२४ रोजी वेल्फेअर ट्रस्ट, बुलडाणा अर्बन रेसिडेन्सी समोर, मलकपूर रोड, बुलडाणा येथे होणार आहे.

मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या अभियानासाठी प्राथमिक शिक्षण अधिकारी खरात, गटशिक्षणाधिकारी गावडे, केंद्र प्रमुख आघाव तसेच श्री शिवाजी शिक्षण संस्था मेहकरचे अध्यक्ष सुदेशभाऊ लोढे सर यांच्या मार्गदर्शनामुळे अगदी सहज आणि सोप्या पद्धतीने अंमलबजावणी करता आली. मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या अभियानाद्वारे राबविलेले सर्व उपक्रम विद्यार्थी केंद्रीत असून त्यांच्या शारीरिक, बौद्धिक, सांस्कृतिक, भावनिक, सामाजिक आणि कौशल्यपूर्ण विकासाला चालना देणारे आहे. शाळेमध्ये नेहमीप्रमाणे सुरु असलेले अभियानातून नव्याने परिचय झालेले उपक्रम शाळेत उत्साह नाविन्यपूर्ण पद्धतीने राबविण्यात आले. शाळेतील विद्यार्थ्यांनी अतिशय चांगला प्रतिसाद देत या अभियानाचे स्वागत केले. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे आपला सहभाग नोंदविला. यामध्ये शालेय मंत्रिमंडळ, शाळा बचत बँक, स्वच्छता मॉनिटर, शालेय पोषण आहार, दैनंदिन वर्गनिहाय परिसर स्वच्छता, अर्थनियोजन आणि व्यावसायिक संबंधित व्याख्यान, किशोरवयीन मुलींसाठी खास व्याख्यान, स्वतःच्या आरोग्याची काळजी करण्यासंबंधी आरोग्यपर व्याख्यान तसेच देशप्रेम आणि राष्ट्रीय एकात्मतेची भावना निर्माण करण्यासाठी सांस्कृतिक कार्यक्रम व विविध स्पर्धा अशा प्रकारचे उपक्रम विद्यार्थ्यांसाठी राबविले आहे. यासर्व उपक्रमांमुळेच श्री शिवाजी हायस्कूल जांभोरा शाळेचा तिसरा क्रमांक लागला असुन या शाळेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# बचत गटाच्या माध्यमातून महिलांनी स्वावलंबी व्हावे

## खासदार प्रतापराव जाधव यांचे प्रतिपादन...

जनसंचलन / साखरखेर्डा

बचत गटाच्या माध्यमातून महिलांनी स्वावलंबी व्हावे, यासाठी केंद्र सरकारची आर्थिक मदत दिल्या जाते. आज कित्येक महिलांनी बचत गटाच्या माध्यमातून व्यवसाय उभा केला आहे. महिला सक्षमीकरणाचे पाऊल आहे. यासाठी बचत गटांना जी काही मदत लागेल, ती शासनाच्या माध्यमातून करण्यात येईल, असे प्रतिपादन खासदार प्रतापराव जाधव यांनी साखरखेर्डा येथील बचत गटांच्या मेळाव्यातून केले. साखरखेर्डा येथे ८ मार्च रोजी महिला आर्थिक विकास महामंडळाच्या वतीने महिला बचत गटांच्या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी सरपंच सुमन जगताप होत्या, तर माजी समाज कल्याण सभापती बाबूराव मोरे, माजी उपसभापती सुनील जगताप, माजी सरपंच कमलाकर गवई, युवा सेना तालुकाप्रमुख संदीप मगर, गंभीरराव खरात, शिंदीचे सरपंच अशोक खरात, संदीप खिल्लारे, अनिकेत सैनिक स्कूलचे अध्यक्ष अर्जुन गवई, प्रफुल्ल शेळके, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक दिलीप बेंडमाळी, बचत गटाच्या अध्यक्षा कमलबाई जाधव आदी उपस्थित होते. बचत गटामुळे महिला आर्थिक सक्षम बनण्यास मदत होत असल्याचे चित्र आहे, असे ते म्हणाले. बचत गटांसाठी हक्काचे कार्यालय उपलब्ध व्हावे, यासाठी महिलांनी ग्रामपंचायतीकडे मागणी केली असता, ग्रामपंचायतीच्या सरपंच सुमनताई जगताप यांनी ठराव घेऊन इमारत हस्तांतरित केली. यासाठी माजी सरपंच कमलाकर गवई आणि अर्जुन गवई यांनी पुढाकार घेतला.

बुलडाणा शहर व परिसरातील रुग्णांच्या सेवेसाठी अत्याधुनिक सेवा सुविधांनी सुसज्ज असे
डॉ. ऋषिकेश अशोक निकम यांचे ....
निकम ॲक्सिडेंट व ट्रॉमा सेंटर
पत्ता: डॉ. व्यवहारे हॉस्पिटल(पहिला मजला), जांभरुण रोड, बुलडाणा
मो. 9923191666
* उपलब्ध सुविधा *
• कृत्रिम सांधे प्रत्यारोपण
• अति जोखीमीचे हाडांची शस्त्रक्रिया
• लहान बाळांचे जन्मजात वाकडे पायावर उपचार (क्लबफूट)
• संधीवातावर उपचार
• गुडघ्याची दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया
• फ्रॅक्चरवर अत्याधुनिक तंत्रज्ञानाद्वारे उपचार व शस्त्रक्रिया
• मणक्यातील आजारावर उपचार
• दुर्बिणीद्वारे सांध्याची तपासणी व शस्त्रक्रिया
• कंबरेचे व मानेचे दुखणे
• पायातुन व हातातून तीव्र वेदना, मुंग्या येणे, असु होणे यावर उपचार
डॉ. ऋषिकेश अशोक निकम
M.B.B.S, D-ORTHO (Mumbai)

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958